ePaper

| वर्ष - 6 | अंक - 356 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार दि. 16 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## कुख्यात गुंड अतिक अहमदची गोळ्या घालून हत्या




### आतील पानांत

- कसब्यातील प्रयोग इतरत्र यशस्वी होऊ देऊ नका
- मीम स्पर्धेतून 'मीम्स'चा पाऊस
- अमित शाह मुंबईत!






# 'शॉर्टकट' बेतला जीवावर!

## » बोरघाटातील घटनेमुळे हळहळ : महामार्गावरील अपघातांचा प्रश्न गंभीर

**| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**बोरघाटात शुक्रवारी प्रवासी बसला झालेल्या अपघातात तेरा तरुणांना आपला जीव गमवावा लागला. पुणे-मुंबई जुन्या महामार्गावर शिंग्रोबा मंदिरामागील रस्ता जड वाहतुकीसाठी प्रतिबंध असलेल्या एकेरी वळण रस्त्यावर वाहन दामटल्यानेच अपघाताची घटना घडली. वास्तविक अत्यंत अरुंद तीव्र उतार व वळण असलेला हा रस्ता पूर्वीपासून अपघातप्रवण क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.**

खोपोलीतून खंडाळ्याच्या दिशेने येणारी वाहने ही शिंग्रोबा मंदिरमार्गे घाटावर येतात. मुळात हा मार्ग एकेरी आहे. मात्र, खोपोलीत जाताना मोठा वळसा मारावा लागतो. त्यामुळे वाहने खंडाळा घाट 'व्ह्यू पॉइंट'पासून एकेरी मार्गाने घाट उतरतात. त्यामुळे काही वेळा घाट चढताना वाहनचालकांना कसरत करावी लागते. शिंग्रोबा मंदिरापासून अवघड वळण चढून वर आल्यावर घाटात खोपोली पोलिसांचे मदत केंद्र आहे. याठिकाणी पोलिस वाहन तपासणीसाठी उभे असतात. कदाचित यामुळे बसचालकाने खोपोलीकडे जाताना बंदी असतानाही हा मार्ग निवडला असावा. पहाटेची वेळ असल्याने अरुंद रस्ता असल्याने वळणावर चालकाचे भरधाव वेगामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस डाव्या बाजूने खोल दरीत कोसळली असावी, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### यापूर्वीच्या काही घटना

» २८ मे २०१२ : खालापूर टोलनाक्याजवळ घाटकोपर येथून पुण्याकडे लग्नाचे वऱ्हाड घेऊन येणाऱ्या बसचे चाक बदलत असताना भरधाव टेंपोने बसला मागून धडक दिली. त्यात बसपुढे बसलेल्या २६ जणांचा मृत्यू झाला होता

» ५ जून २०१६ : द्रुतगती मार्गावर खोपोली पोलिस स्टेशन हद्दीत ढेकूजवळ भरधाव बसने दोन वाहनांना ठोकर देत बस पन्नास फूट खोल खड्ड्यात उलटली होती. त्यात १७ जणांचा बळी गेला होता

» ११ डिसेंबर २०२२ : बोरघाटात जुन्या राष्ट्रीय महामार्गावर चेंबूर येथील कोचिंग क्लासची सहल घेऊन जाणारी खासगी बस उलटल्याने दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता



### बोरघाटातील 'ब्लॅक स्पॉट'

» सायमाळ : घाट उतरताना अवघड वळण व तीव्र उतारामुळे वाहनचालकांचे नियंत्रण सुटते

» शिंग्रोबा मंदिरापुढील वळण : शिंग्रोबा मंदिरपासून पुढे आल्यावर घाट चढताना 'एस' आकाराचे वळण आणि तीव्र चढ आहे. घाट चढताना वाहनचालकांची या ठिकाणी दमछाक होते. बहुतेक वेळा वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन मागे येत दरीत कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत

» दस्तुरी-गारमाळ शॉर्टकट फाटा : याठिकाणी जुना पुणे-मुंबई महामार्ग द्रुतगती मार्गाला जोडला जातो, तीव्र उतार व वळण असल्याने याठिकाणी वाहनावरील नियंत्रण सुटते किंवा ब्रेक्स निकामी होता. त्यामुळे याठिकाणी वाहने उलटून अपघात झाल्याने जीवितहानी झाली आहे. खोपोली जाताना आणि खंडाळ्याकडे येताना वाहनचालक अनेकवेळा या शॉर्टकट मार्गाचा अवलंब करतात. पोलिसांच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मातीचा भराव टाकून व बॅरिगेड लावण्यात आले आहेत

» खंडाळा सनसेट पॉइंट : घाट सुरू होतानाच सुरवातीस नेताजीवाडी येथे तीव्र वळण व उतार आहे. दोन्ही बाजूने वाहतूक असल्याने कधीकधी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघाताच्या घटना घडतात

» अमृतांजन पूल : खंडाळा बोगदा सोडल्यावर तीव्र उतार व वळण असल्याने वाहनावर नियंत्रण राखले जात नाही, अनेक वेळा ब्रेक नादुरुस्त झाल्याने अमृतांजन पुलाच्या पट्ट्यात अपघाताच्या घटना घडल्या आहेत

# कसब्यातील प्रयोग इतरत्र यशस्वी होऊ देऊ नका

## 'चंद्रकांत पाटलांचा भाजप कार्यकर्त्यांना सल्ला




। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर (जि. पुणे) : भाजपबद्दलची (BJP) भीती हेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस) या पक्षांना एकत्र ठेवणारे फेव्हिकॉल आहे. कसबा मतदार संघात ते यशस्वी झाले असले तरी भविष्यातील राजकारणात त्यांचा हा प्रयोग यशस्वी होणार नाही, याची खूणगाठ मनाशी बांधा, असा सल्ला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिला.**

शिरूर तालुका भाजपच्या वतीने न्हावरे फाटा (ता. शिरूर) येथील निसर्ग मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या भाजप कार्यकर्ता मेळाव्यात पाटील बोलत होते. या वेळी प्रवीण फडतरे व बापूसाहेब भुजबळ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी भाजपमध्ये प्रवेश केला.

ते म्हणाले की, आगामी लोकसभा, विधानसभेपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका व बाजार समिती या सर्वच निवडणूकांत भाजपच्या वाढत्या सामर्थ्याला घाबरून महाविकास आघाडीतील तीन्ही पक्ष एकत्र येणार आहेत, हे गृहित धरून आत्तापासून सुक्ष्म नियोजन करावे.

पक्षीय विचारधारा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हे शिरोधार्य तर आहेच. पण केंद्र व राज्यात असलेल्या सत्तेच्या माध्यमातून समाजापर्यंत ठोकून विकासाची कामे आणा आणि सामान्य लोकांना पक्षाशी जोडून विकासकामांच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाची 'व्होटबँक' मजबूत करा", असे आवाहनही त्यांनी केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेसला ओपन चॅलेंज आणि पवारांच्या राजकारणाविरोधात थेट तोफा डागत पालकमंत्री चंद्रकांत पाटील मैदानात उतरल्यानेच त्यांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जाते. अशा स्थितीत भाजपच्या कार्यकर्त्यांनी चंद्रकांतदादांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहून विरोधकांच्या आरोपांना जशास तसे उत्तर द्यावे. विरोधकांनी चंद्रकांतदादांची कितीही बदनामी केली आणि त्यांच्याविरोधात आंदोलने केली तरी त्यांच्या आरोपांनी दादा थांबणार नाहीत किंवा विचलित होणार नाहीत, असे भाजपचे जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे यांनी स्पष्ट केले.

विधानसभेच्या २०२४ च्या निवडणूकीत शिरूरमधून भाजपचा आमदार होईल, पण त्यासाठी पक्षाची ध्येयधोरणे, विचारधारा, सरकारचे काम, जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत घेऊन जाव्या लागतील, असेही जिल्हा संघटन सरचिटणीस ॲड. धर्मेंद्र खांडरे यांनी स्पष्ट केले.

या वेळी माजी मंत्री बाळा भेगडे, जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब सातव, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य राहुल पाचर्णे, माजी जिल्हा परिषद सदस्य जयश्री पलांडे, भाजप कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष गणेश ताठे, जिल्हाध्यक्ष जयेश शिंदे, भाजप अल्पसंख्यांक आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रेश्मा शेख, जिल्हाध्यक्ष राजूभाई शेख, भाजप महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा वैजयंती चव्हाण, शहर अध्यक्ष रश्मी क्षीरसागर; तसेच आबासाहेब सरोदे, राजेंद्र गदादे व विक्रम पाचुंदकर हे उपस्थित होते.

# वेताळ टेकडी वाचवण्यासाठी पुण्यात भर पावसात लॉंग मार्च

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

वेताळ टेकडी येथील प्रस्तावित असलेल्या बालभारती ते पौडफाटा रस्ता, दोन बोगदे या प्रकल्पाला विरोध दर्शविण्यासाठी आज पुण्यात वेताळ टेकडी कृती समितीच्या वतीने भरपावसात वेताळ बाबा चौक ते खांडेकर चौकदरम्यान लॉंग मार्च काढण्यात आला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या राज्यसभा खासदार वंदना चव्हाण, भाजपाच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी, कॉंग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री रमेश बागवे यांच्यासह हजारोंच्या संख्येने पर्यावरण प्रेमी या लॉंग मार्चमध्ये सहभागी झाले होते. यामध्ये लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकदेखील सहभागी झाले होते. पुण्याच फुफ्फुस वाचवा, वेताळ टेकडी वाचवा! पुणे वाचवा! वेताळ टेकडीवरील प्रकल्प रद्द करा!

### वेताळ टेकडीवर कोणत्याही प्रकारचा प्रकल्प होता कामा नये – वंदना चव्हाण

टेकड्या आणि सयकल ही पुणे शहराची ओळख होती. पण हळूहळू शहरात सायकल चालविण्याचे प्रमाण कमी झाल्यानंतर असंख्य नागरिक दररोज सकाळी आणि संध्याकाळी विविध टेकड्यांवर चालण्यासाठी जातात. त्यातील एक वेताळ टेकडी असून आता त्या ठिकाणी रस्ता करण्याचा घाट घातला जात आहे. पुणे शहरातील टेकड्या हे फुफ्फुस असून त्या वाचवल्या पाहिजेत. त्यामुळे वेताळ टेकडीवर कोणत्याही प्रकारचा प्रकल्प होता कामा नये. या विरोधात आम्ही अखेरपर्यंत लढा देणार, अशी भूमिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार वंदना चव्हाण यांनी मांडली.




# पावसामुळे झाडे पडल्याने वाहतुकीवर परिणाम

## वाहतुकीचा वेग मंदावला

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**- शनिवारी सायंकाळी झालेल्या पावसामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने, झाडे पडल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. विशेषतः विधी महाविद्यालय रस्ता, सेनापती बापट रस्ता, बिबवेवाडी, बाणेर बालेवाडी येथील रस्त्यांवर पावसामुळे वाहतुक मंदावली. एक तासाहून अधिक काळ वाहतुक कोंडी झाल्याने नागरीक अक्षरशः त्रस्त झाले.**

मागील काही दिवसांपासून शहरामध्ये सायंकाळी पाऊस येत आहे. सायंकाळी नागरिक घरी परतण्याच्या मार्गावर असतानाच पावसाचे आगमन होत असल्याने नागरीकांची मोठ्या प्रमाणात तारांबळ उडत असल्याची सद्यस्थिती आहे.

त्यानुसार, शनिवारी सायंकाळी झालेल्या पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने वाहनांची गती मंदावली. विधी महाविद्यालय रस्ता, सेनापती बापट रस्ता, जंगली महमाराज रस्ता, कात्रज, वारजे माळवाडी, बाणेर, बालेवाडी, बिबवेवाडी, सातारा रस्ता, उंड्री, पिसोळी, फुरसुंगी या परिसरामध्ये पाऊस झाला. पावसामुळे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर तुंबल्याने वाहनांची गती मंदावली.

त्यामुळे काही ठिकाणी वाहतुक कोंडी झाली, तर काही ठिकाणी वाहतुक संथ गतीने सुरु होती. बिबवेवाडी येथे रस्त्यांवर पाणी साठले, तसेच चेंबरची झाकणे उचकटून पावसाचे पाणी बाहेर आल्याने रस्त्यावर पाणी वाहू लागले. त्याचबरोबर काही ठिकाणी मोठमोठी झाडे कोसळून रस्त्यांवर पडली. त्यामुळे वाहनचालकांना पुढे जाण्यास अडथळा आला.अशा वेगवेगळ्या कारणांमुळे शनिवारी सायंकाळी पुन्हा एकदा नागरीकांना वाहतुक कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागला. सेनापती बापट रस्ता परिसरातही पावसामुळे वाहतुक खोळंबली.

### शहरात झाडपडीच्या 12 घटना

शहरात सायंकाळी पडलेल्या पावसामुळे ठिकठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या. बिबवेवाडी, एरंडवणे, महात्मा फुले पेठ, तळजाई, कोंढवा, विधी महाविद्यालय रस्ता,लुल्लानगर, धनकवडी, कात्रज माणिकबाग या ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या.



"सेनापती बापट रस्त्यावरुन सायंकाळी साडे पाच वाजता चतुःश्रृंगीहून कोथरुडला निघालो होतो. जे.डब्ल्यू मॅरीएट हॉटेलजवळील चौकात आल्यानंतर वाहतुक कोंडी सुरु झाली. सुमारे तासभर वाहतुक कोंडीत अडकून पडलो. पर्यायी मार्गही वाहनांच्या गर्दीने भरले होते.

- " किसन कोऱ्हाळकर, नोकरदार

त्याचबरोबर बालभारती - पौड फाटा रस्त्याला विरोध दर्शविण्यासाठी वेताळ टेकडी बचाव कृती समितीच्यावतीने आयोजित केलेल्या शांतता रॅलीमध्ये नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यामुळे देखील सेनापती बापट रस्त्यावरील वाहतुक कोंडीमध्ये भर पडली.

नरवीर तानाजी मालुसरे रस्ता (सिंहगड रस्ता), एसएनडीटी या ठिकाणी दुचाकी, चारचाकी वाहनांवर झाडे कोसळल्याने वाहनांचे नुकसान झाले. अग्निशामक दलाच्या जवानांनी रस्त्यांवर पडलेली झाडे कापून बाजुला करीत वाहतुकीला रस्ता मोकळा करुन दिला.

# मीम स्पर्धेतून 'मीम्स'चा पाऊस!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा उपक्रम : राज्यभरातून मोठा प्रतिसाद

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी: पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच 800 कोटींचा वसुलीचा टप्पा पार करण्याचा विक्रम केला. महापालिकेने यासाठी विविध योजना, जप्ती मोहिम, जनजागृती मोहिम राबविण्यात आल्या. फेसबुकसारख्या सोशल मीडियावरील 'मराठी मीम्स मॉक्स' ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेकडून फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये दोन टप्प्यात घेण्यात आलेल्या 'मी थकबाकीदार' मीम्स स्पर्धेमध्ये राजेश शिंदे, पुणे यांना प्रथम तर प्रसाद मोरे, पुणे द्वितीय तर योगेश भागवतकर यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकाविले आहे.**

महापालिकेच्या मीम स्पर्धेला राज्यभरातून हजारो नागरिकांनी प्रतिसाद दिला. महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह व कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्या कल्पक पुढाकाराने महापालिकेच्या अभियानामध्ये नागरिकांचा थेट सहभाग नोंदविला गेला.कल्पक आवाहन, चित्रपटांच्या संवादातील विनोद, मराठी, दाक्षिणात्य व हिंदी चित्रपट नायकांच्या गाजलेल्या संवादातून नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे आवाहन करण्यात आले. फेसबुकवरील मराठी मीम्स मॉक्स यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या स्पर्धेला हजारो नागरिकांनी आपल्या (PCMC ) कल्पनांतून मालमत्ता कराबाबत प्रबोधन केले.

### विजेत्यांची नावे व बक्षीस...

- प्रथम क्रमांक – राजेश शिंदे, पुणे – 5000 रुपये
- द्वितीय क्रमांक – प्रसाद मोरे, पुणे – 3000रुपये
- तृतीय क्रमांक – योगेश भागवतकर – 2000 रुपये



### चौकटीबाहेरचे प्रबोधन

सरकारी यंत्रणा सरकारी कामांचे वर्तमानपत्र जाहिरात, रेडिओ जाहिरात यासारख्या पारंपरिक पध्दतीच्या व्यासपीठावरुन प्रबोधन करते. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या पुढाकाराने सध्या सुरु असलेल्या मीम्ससारख्या नव्या ट्रेंड्च्या माध्यमातून थकित मालमत्ता कर भरण्यासाठी #मी_थकबाकीदार नावाने मीम स्पर्धा घेण्यात आली. त्यास अक्षरशः हजारो नागरिकांनी प्रतिसाद देऊन त्यावर आपल्या कल्पक टिप्पण्या केल्या. यातूनच विषय मांडणी, चित्रांची मांडणी, कल्पकता याआधारे पहिले तीन क्रमांकास पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. शोले, शाळा, दुनियादारी, सिंघम, सैराट, अशी ही बनवाबनवी, मुळशी पॅटर्न सारख्या बहुचर्चित चित्रपटातील संवाद या मिम स्पर्धेचे खास वैशिष्ट्य ठरले.

> आजच्या काळात मिमकडे मनोरंजनाचे माध्यम म्हणून पाहिले जात असले तरी त्यातून अनेकदा सामाजिक संदेश पण दिला जातो. हेच लक्षात घेऊन कर भरण्यासाठी लोकांचे प्रबोधन व्हावे यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम यशस्वी झाल्याने इतरही पालिकांमध्ये याच धर्तीवर मिम्स तयार करण्यात आले होते.
> - नीलेश देशमुख, सहायक आयुक्त.

# मावळातील रेल्वे कामांना गती!

## खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती : मुंबई रेल्वे विभागाचे रजनीश के. गोयल यांच्याशी चर्चा

।मावळ ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघातील मुंबई विभागातील पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, लोणावळ्यातील (खंडाळा) भागात सद्यस्थितीत सुरू असलेल्या रेल्वेच्या कामांना गती मिळाली आहे. लोणावळा, कर्जत येथील ओव्हर ब्रिजसह अनेक कामे अंतिम टप्प्यात आहेत. प्रलंबित कामे पूर्णत्वाकडे जात असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**



मावळ लोकसभा मतदारसंघ रेल्वेच्या मुंबई आणि पुणे विभागात येतो. मुंबई विभागात पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, डोंगरगाव, खंडाळा हा मावळ मतदारसंघातील भाग येतो. मुंबई विभागातील मतदारसंघातील रेल्वेच्या विविध कामासंदर्भात खासदार बारणे यांनी मुंबई रेल्वे विभागाचे डीआरएम रजनीश के. गोयल यांच्या समवेत नुकतीच बैठक घेतली. सद्यस्थितीत सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्प आणि नवीन कामे हाती घेण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

मुंबई मध्य रेल्वे अंतर्गत येणाऱ्या लोणावळा ते मुंबई या मार्गातील गेट क्रमांक २२ अंबिवली, २३ भिवपुरी, २५ अशाने कोषाने, २६ सावरगाव, २७ किरवली हे सर्व कर्जत तालुक्यातील तसेच गेट क्रमांक ३४ डोंगरगाव, २९ खंडाळा गावठाण आणि गेट क्रमांक ३१ जुना खंडाळा (लोणावळा ) येथे रेल्वे ओव्हर ब्रिजचे कामे केली जाणार आहेत. ही कामे लवकरात लवकर सुरू करावीत. पनवेल ते खारकोपर लोकल सेवा सुरू आहे. खारकोपर ते उरण रेल्वे मार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. या कामाला गती देवून पूर्णत्वाकडे नेण्याबाबत सूचना केल्या. लोणावळा, कर्जत येथील ओव्हर ब्रिजच्या कामाला गती द्यावी.)



### पनवेल रेल्वे सेवेचाही घेतला आढावा....


अनेक नवीन कामाचे कार्यारंभ आदेश दिले आहेत. त्या कामाला लवकरात लवकर सुरुवात करावी. नेरळ रेल्वे स्टेशनच्या कामाला गती द्यावी. याशिवाय नेरळ ते माथेरान दरम्यान चालू असलेल्या ट्राय ट्रेनचा आढावा घेतला. त्यातील काही त्रुटीमध्ये सुधारणा करावी. पर्यटकांना कोणताही त्रास होणार नाही, याची खबरदारी घेण्याबाबत सूचना दिल्या. पनवेल रेल्वे सेवेचाही आढावा घेतल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

## संपादकीय »

# बाबासाहेबांचे विचार अन् आजची लोकशाही

***इंग्रजांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी प्रदीर्घ काळ देण्यात आलेल्या लढ्यामध्ये धर्म, जात, भाषा, प्रांत इ. सर्व गोष्टी विसरून भारतीय जनतेने दिलेल्या अपूर्व लढ्यामुळे काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचा स्वीकार केला.***

तसेच, इंग्रजांनी शेवटच्या चार दशकांत केलेल्या कायद्यांमुळे अध्यक्षीय लोकशाहीऐवजी 'संसदीय लोकशाही'चा स्वीकार करणे स्वाभाविक होते. त्याचे दुसरे एक महत्त्वाचे कारण म्हणजे भारतातील सर्व प्रकारची विविधता सामावून घेण्याची क्षमता बहुपक्षीय संसदीय लोकशाही पद्धतीच अधिक आश्वासक व सर्वसमावेशक होती/आहे. भारतात लोकशाही यशस्वी होईल की नाही, याची जगातील अनेक घटनातज्ज्ञ व राजकीय पंडितांना शंका होती. लोकशाही यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबाबत त्यावेळची भारतातील प्रतिकूल परिस्थिती ध्यानात घेतली, तर त्यांची शंका चुकीची नव्हती. परंतु त्या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या व लोकशाही स्वीकारलेल्या सर्व देशांमध्ये शासनपद्धती म्हणून ती यशस्वी करणारा भारत हा एकमेव देश आहे. आणि त्याचे संपूर्ण श्रेय लोकशाहीवर दृढ श्रद्धा असलेल्या भारतीय जनतेला जाते. लोकशाही म्हणजे 'जीवनमार्ग'. मात्र, असे असले तरी, भारतातील लोकशाहीच्या गाभ्याचे स्वरूप पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्या संदर्भात नेमकी कोणती आव्हाने वाटत होती, ती पेलण्यासाठी कोणत्या अटी वा शर्ती पूर्ण करणे त्यांना आवश्यक वाटत होते, इत्यादी गोष्टी, विशेषत: आजच्या संदर्भात, समजून घेणे आवश्यक वाटते. सर्वात प्रमुख बाब म्हणजे डॉ. आंबेडकर यांच्या मते लोकशाही ही केवळ शासनपद्धती नव्हे, तर तो 'जीवनमार्ग' आहे. हाच मुद्दा केंद्रस्थानी ठेवून त्यांनी लोकशाहीची व्याख्या केली, ती अशी: "रक्ताचा एकही थेंब न सांडता शांततेच्या मार्गाने समाजामध्ये मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणे शक्य असलेली व्यवस्था म्हणजे लोकशाही." डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या अशी का केली असावी, याची, माझ्या मते, तीन मुख्य कारणे संभवतात. पहिले समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या आधुनिक मूल्यांवर आधारलेल्या उदारमतवादी लोकशाहीवर त्यांची व्यक्तिश: नितांत श्रद्धा होती. दुसरे, भारतातील सर्व प्रकारच्या विषमतेमुळे शेकडो वर्षे वंचित व शोषित राहिलेलेल्या दलित, आदिवासी आणि स्त्रिया यांना फक्त लोकशाहीच न्याय देऊ शकेल, अशी त्यांची खात्री होती.




# पद्मश्री डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी; ज्ञानियाचा वेलू गेला गगनावरी..!



लाखो श्री सदस्यांचे श्रद्धास्थान आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आणि आनंद गगनात मावेनासा झाला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या शासनानं आप्पासाहेब धर्माधिकारी यांचा केलेला बहुमान हा समस्त श्री सदस्यांच्या कार्याचा गौरव आहे. बैठक चळवळीचे प्रणेते कै. महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी यांनी दासबोधाच्या निरुपणातून समाजमनात अमूलाग्र बदल करण्याचा ध्यास घेतला आणि देव, स्वदेश व धर्म या त्री -सूत्रीतून समाजातील अंधव्यवस्थेवर दासबोधी विचारांच्या माध्यमातून प्रहार करत समाजाला सकारात्मक वाटेवर आणलं. बैठक चळवळीतून असंख्य व्यसनी लोकांना आध्यात्मिक शिकवणीतून चांगुलपणाच्या वाटेवर आणलं. नानासाहेब धर्माधिकारी यांची समाज बदलाची ही धुरा त्यांचे सुपुत्र आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी लीलया पेलली आणि त्यातून आज बैठक चळवळीचा विश्वात्मक परीघ कवेत घेणारा चळवळीचा वटवृक्ष दिमाखात उभा आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळी नंतर वैचारिक प्रेरणेच्या बळावर समाजमनामध्ये अमूलाग्र क्रांती करणारी श्री सदस्यांची दासबोधी चळवळ ही वर्तमानातील सकारात्मक घडामोड आहे. भारतीय स्वातंत्र्याकरीता क्रांतीकारकांच्या ओजस्वी विचारातून भारतीय स्वातंत्र्याचं रणशिंग फुंकल गेलं, पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उण्यापुऱ्या ७५ वर्षात सामाजिक ध्येयवाद हा कमालीचा कमकुवत झाला. विकासाच्या प्रगतीत संवादाची भाषा थिटी पडू लागली. मग साहजिकच आधुनिकता, चंगळवाद याने समाजातील दोन पिढींना घेरुन टाकलं. कोणत्याही देशाची सामाजिक शक्ती ही त्या देशातील नागरिकांच्या चांगुलपणावर मोजली जाते. विकासाच्या विचारशून्य यंत्राने नव्हे.विकासाच्या वाटचालीत आर्थिक विषमतेची दरी, त्यातून निर्माण होत असलेलं दारिद्रय, अपेक्षांचं ओझं सांभाळता येत नसल्यानं कुटुंबात शिरणारं औदासिन्य, यावर क्षणभर सुखाची फुंकर म्हणून नकळतपणे स्वीकारली जात असलेली व्यसनाधीनता, दारिद्रय निर्मूलनासाठी अंधश्रद्धेचा पगडा, त्यातून येणारं वैफल्य याने समाजमन पोखरू लागलं होतं. ही सारी घलमेल कनिष्ठ, मध्यमवर्गीय दारिद्र्य रेषेखालच्या कुटुंबात सुरु होती. तर अतिश्रीमंतांच्या घरात पैसा असून देखील संवादाची वैचारिक समृद्धी नसल्यानं अशी कुटुंब देखील मानसिक विकारानं पछडली होती. यावर बैठक चळवळीच्या माध्यमातून केलं गेलेलं वैचारिक प्रबोधन यातून सशक्त समाजमनाची निर्मिती केली गेली आणि ती अव्यहातपणे सुरूच आहे. नानासाहेब धर्माधिकारी यांनी सुरु केलेल्या श्री सदस्यांच्या चळवळीला वर्तमानातील समाजमनातील महत्वाच्या प्रश्नाची दिलेली जोड हे आप्पासाहेब धर्माधिकारी याचं वेगळपण आहे. श्री समर्थ रामदासांच्या "केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे" या समर्थ वचनाप्रमाणे आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी आपल्या मितभाषी, शालीन, सुसंस्कृत, मृदू, सत्वशील व सत्यवचनी स्वभावातून समाजात दिसून येत असलेलं उणपूर भान जबाबदारीने पेलत, त्याला सामाजिक चळवळीचा नवीन आयाम दिला. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी बदलत्या पर्यावरणाच स्वरूप लक्षात घेऊन वृक्ष लागवड व तीचं संगोपन, स्वच्छता अभियान ही अभिनव चळवळ सुरु केली.

# झळा लागल्या जीवा!



**पृथ्वीवर हजारो वर्षांपासून हवामान आणि पर्यावरण यांचा निसर्गनियमांप्रमाणे समतोल राखला जात होता; परंतु औद्योगिक क्रांती आणि एकूणच माणसाच्या विकासासाठी खूप झाडे आपण तोडायला सुरुवात केली. लोकसंख्या वाढली, प्रदूषण वाढले आणि शहरे सुजायला लागली.**

त्या विकासाच्या घोडदौडीत निसर्गाचा समतोल मात्र माणसाने बिघडवला. आता त्याचेच परिणाम तापमानात वाढ, हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तीच्या स्वरूपाने आपण पाहत आणि अनुभवत आहोत.

हिवाळ्यात लावावा लागणारा कूलर-एअर कंडिशन, अवकाळी येणारा पाऊस, ४०-४५ डिग्रीपर्यंत जाणारे तापमान हे काही आपल्याला नवीन नाही. आता हवामान बदल दूर राहिला नसून, तो आपण प्रत्यक्षात अनुभवत आहोत.

कॅनडामध्ये आलेली उष्णतेची लाट, सौदी अरेबियामध्ये आलेला पूर, ऑस्ट्रेलियात लागणारे वणवे हेदेखील त्याचाच भाग आहे. जगासमोर असलेलं हवामान बदल हे सर्वात मोठं आव्हान असून, त्याचा परिणाम समाजातील सर्व स्तरांवर दिसून येत आहे.

अनेक संशोधक वाढणारे तापमान, वितळणारी हिमशिखरं-हिमनद्या, सतत येणारी वादळं, पूर, दुष्काळ आणि समुद्राच्या पातळीत होणारी वाढ याचा संबंध हरितवायू उत्सर्जनाशी लावतात. त्याचा परिणाम आपल्याला कमी-जास्त प्रमाणात जगाच्या सगळ्या कोपऱ्यात, भारतात आणि महाराष्ट्रातही दिसून येतो. या वातावरण बदलाचा तुमच्या-माझ्यावर आणि महाराष्ट्रावर काय परिणाम होणार आहे, हे जाणून घेणे गरजेचे आहे.

आज कार्बनडायॉक्साइड (CO2), मिथेन, ओझोन आणि पाण्याची वाफ हे हवेत नसते, तर आपली पृथ्वी ही ३० डिग्रीनी आजपेक्षा थंड असती. म्हणजेच काय तर पृथ्वीवरील तापमान नियंत्रित ठेवण्यात या वायूंचा मोठा वाटा आहे.

एकूण वातावरणातील या वायूंच्या प्रमाणातील बदलाचा पृथ्वीवरील तापमानावर परिणाम होतो. आयपीसीसी (इन्टरगव्हर्मेंटल पॅनेल ऑन क्लॅमेट चेंज)च्या रिपोर्टनुसार १८८०-२०१२ या काळात पृथ्वीचे तापमान ०.८५ डिग्रीनी वाढले, जे मुख्यतः कार्बनडायॉक्साइडसारख्या हरितगृह वायूंच्या अतिउत्सर्जनामुळे झाले, असे अभ्यासक मानतात.

बर्फात अडकलेल्या हवेच्या अभ्यासावरून चार लाख वर्षांपूर्वीपर्यंत हवेत कार्बनडायॉक्साइडचे प्रमाण किती असावे, याचा अंदाज बांधता येतो.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अमित शाह मुंबईत!


## आप्पासाहेब धर्माधिकारी यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने होणार गौरव

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ निरुपणकार, पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना आज, रविवारी सकाळी १०.३० वाजता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. नवी मुंबईतील खारघर येथील आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट मैदानावर हा सोहळा होणार आहे. यापूर्वी ज्येष्ठ निरुपणकार, पद्मश्री नानासाहेब धर्माधिकारी यांनाही महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला होता.**

या महासोहळ्याची जय्यत तयारी खारघर येथे सुरू असून श्री सदस्यांसाठी २ दिवस टोलमाफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: दोन वेळेस सोहळ्याच्या ठिकाणी भेट देऊन तयारीचा आढावा घेतला. या सोहळ्याची इतिहासात नोंद घेतली जाईल, ना भूतो न भविष्यती असा हा कार्यक्रम होईल, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी आयोजनात सहभागी अधिकारी, कर्मचारी, श्री सदस्य यांना सोहळा यशस्वीतेसाठी आवाहन केले आहे.

या सोहळ्यासाठी सुमारे २० लाखांपेक्षा जास्त नागरिक, श्री सदस्य उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन नियोजनपूर्वक काम सुरू आहे. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वाहन तळ, वाहतूक सुरळीत राहण्यासाठीचे



नियोजन याकडे लक्ष देण्यात येत आहे. नागरिकांना रेल्वे स्थानकापासून ते सोहळ्याच्या ठिकाणी नेण्यासाठी बसेसची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. सोहळ्याच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून सुमारे २५० टँकर आणि २ हजार १०० नळ बसविण्यात आले आहेत. वैद्यकीय सुविधादेखील तैनात करण्यात आली असून ६९ रुग्णवाहिका, ३५० डॉक्टर्स, १०० नर्स आणि कर्मचारी कार्यरत आहेत. ३२ फिरती शौचालये, ४२०० पोर्टेबल शौचालये, कार्यक्रमस्थळी ९ हजार तात्पुरती शौचालये बांधण्यात आली आहेत. स्वच्छता व्यवस्थेसाठी ६० जेटींग मशीन, ४ हजार सफाई कर्मचारी, शिवाय २६ अग्निशमन वाहने उपलब्ध आहेत. पार्किंगसाठी २२ ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी ६०० स्वयंसेवक, २०० कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

केंद्रीय मंत्री अमित शाह हे शनिवारी रात्री मुंबईत दाखल झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार प्रसाद लाड, प्रविण दरेकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी अमित शाह यांचे विमानतळावर स्वागत केले.

### मुख्यमंत्री शिंदेंनी घेतला आढावा



**“ मुंबईः राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ निरुपणकार, पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना उद्या (रविवारी) १६ एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. नवी मुंबईतील खारघर येथील आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट मैदानावर हा सोहळा होणार आहे. या महासोहळ्याची जय्यत तयारी खारघर येथे गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: दोन वेळेस सोहळ्याच्या ठिकाणी भेट देऊन तयारीचा आढावा घेतला. या सोहळ्याची इतिहासात नोंद घेतली जाईल, ना भूतो न भविष्यती असा हा कार्यक्रम होईल, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी सोहळ्याच्या आयोजनात सहभागी अधिकारी, कर्मचारी, श्री सदस्य यांना सोहळा यशस्वीतेसाठी आवाहन केले आहे. सकाळी साडे दहाच्या सुमारास हा सोहळा होणार आहे. त्यासाठी महापालिका, सिडको, सार्वजनिक बांधकाम, पोलिस, आरोग्य आदी विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि श्री सदस्य त्यासाठी परिश्रम घेत आहेत. या सोहळ्यादरम्यान, पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्यावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. सोहळ्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह धर्माधिकारी कुटुंबिय उपस्थित राहणार आहेत.**

# जालन्यात पाणी टंचाई!

# अंबड तालुक्यातील 17 गावांमध्ये पाणी उपसा करण्यास बंदी

## या सर्व टंचाईग्रस्त गावांत 30 जूनपर्यंत पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे

। जालना।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यावर्षी राज्यातील काही भागात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये आतापासूनच पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात होणारी पाणी टंचाईलक्षात घेता प्रशासनाकडून आतापासूनच पाऊलं उचलली जात आहेत. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील तब्बल 17 गावांमध्ये पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे.**



याबाबत जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे या 17 गावातून पाणी उपसा केल्यास कारवाई देखील केली जाणार आहे.

येणाऱ्या काळात होणारी पाणी टंचाई पाहता, जिल्हाधिकाऱ्यांनी अंबड तालुक्यातील 17 गावांमध्ये पाणी उपसा करण्यास प्रतिबंध घातला आहे. या गावातून पाणी उपसा केल्यास कारवाई करण्याचा इशाराही जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

येणाऱ्या काळात लागणाऱ्या पाण्याचा विचार करुन भूजल विभागाने जिल्ह्यातील काही गावे टंचाई क्षेत्र म्हणून घोषित केली आहेत. या गावांमध्ये येणाऱ्या काळात भीषण पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी अंबड तालुक्यातील 17 गावांमध्ये पाणी उपसा करण्यास प्रतिबंध घातला आहे. या सर्व टंचाईग्रस्त गावांत 30 जूनपर्यंत पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. आदेशाचा भंग केल्यास महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम 2009 मधील तरतुदीनुसार योग्य ती दंडात्मक कारवाईच्या सूचना उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांना दिल्या आहेत.

**या गावांत पाणी उपसा करण्यास बंदी**

अंबड तालुक्यातील नागझरी, चिकनगाव, माहेर भायगाव, कर्जत, पाडा, टाका, पारनेर, किनगाव वाडी, लोणार भायगाव, कोंडगाव, ढालसखेडा, खेडगाव, भालगाव, जोगेश्वरवाडी, दुनगाव, रामनगर, बक्षाची वाडी या गावांत पाणी उपसा करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

### बदनापूर तालुक्यातही पाणीटंचाई

**दरम्यान जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील अनेक गावांत पाणी टंचाई जाणवू लागली आहे. पाणीटंचाई निर्माण झालेल्या माळेगाव, चनेगाव, कंडारी खुर्द, तुपेवाडी या गावांनी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरु करण्याची मागणी तहसील प्रशासनाकडे केली आहे. त्यातील माळेगावाने प्रस्ताव सादर करुन महिना उलटला, तरी या गावात टँकर सुरु झाले नाहीत. त्यामुळे येथील ग्रामस्थांना विकतच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. विशेष म्हणजे एप्रिलचे आणखी 15 दिवस आणि मे महिना बाकी आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत पाणी प्रश्न आणखीच गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

# अतिक अहमदची गोळ्या घालून हत्या!

## वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन जात असताना वैद्यकीय महाविद्यालयाजवळ गोळ्या झाडल्या

। नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**उत्तर प्रदेशमधील कुख्यात गुंड अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ अहमद यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. दोघांनाही वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन जात असताना प्रयागराज वैद्यकीय महाविद्यालयाजवळ त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. या हल्ल्यात दोघांचाही मृत्यू झाला आहे. दरम्यान, याप्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतलं असल्याची प्राथमिक माहिती आहे**





### 'कोण होता अतिक अहमद?

गुंड अतिक अहमद हा २००५ मधील बसपा आमदार राजू पाल हत्याकांड आणि फेब्रुवारीमध्ये झालेल्या उमेश पाल हत्याकांडातील प्रमुख आरोपी होता. तसेच अतिक अहमदवर उत्तर प्रदेशमध्ये अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. यामध्ये खून, खंडणी अशा गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे.

### दोन दिवसांपूर्वीच असद अहमद चमकमकीत ठार

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी अतिकचा मुलगा असद अहमद आणि शूटर गुलामलाही झाशीमध्ये उत्तर प्रदेश पोलिसांनी ठार केले होते. दोघेही उमेश पाल हत्याप्रकरणातील प्रकरणातील मुख्य आरोपी होते. उत्तर प्रदेश पोलिसांनी दोघांना हत्यारं टाकून आत्मसमर्पण करण्यास सांगितले. मात्र, त्यांनी पोलिसांवर गोळीबार सुरू केला. या चकमकीत दोघांचाही मृत्यू झाला होता.

### काय घडली नेमकी घटना?

माफिया अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ अहमद या दोघांची हत्या करण्यात आली आहे. पोलीस या दोघांनाही मेडिकलसाठी घेऊन जात असताना काही अज्ञातांनी या दोघांवर गोळ्या झाडल्या. या दोघांचीही डोक्यात गोळी झाडून हत्या करण्यात आली. घटनास्थळी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. तीन जणांनी फायरिंग करत या दोघांना ठार केलं आहे. यानंतर संपूर्ण घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गोळीबार झाला तेव्हा अतिक आणि अशरफ दोघेही जागीच कोसळले आणि तिथेच त्यांचा मृत्यू झाला.पोलीस अतिक अहमद आणि अशरफ अहमद या दोघांची मेडिकल चाचणी करण्यासाठी आणण्यात आलं. पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात अतिक आणि अशरफ या दोघांना मेडिकलसाठी नेण्यात येत होतं. त्यावेळी तिथे ANI, PTI या वृत्तसंस्थांचे प्रतिनिधी अतिकशी बोलत होते. अतीक आणि अशरफ मीडियाशी बोलत असतानाच या दोघांवर पोलिसांच्या घेऱ्यात घुसून गोळीबार केला. या भागात अंधाधुंद गोळीबार झाला त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचा गोंधळ उडाला. गोळ्या लागल्यामुळे अतिक आणि अशरफ या दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

### अतीकचे शेवटचे शब्द काय होते?

**» तुम्ही काही म्हणू इच्छिता का? तुम्हाला अंत्ययात्रेत नेलं गेलं नाही. "हो आम्हाला नाही नेलं गेलं... पण मुख्य गोष्ट ही आहे की.." बस यापुढे अतीक अहमद काही बोलणार तितक्यात त्याच्यावर आणि अशरफवर गोळ्या झाडण्यात आल्या. या दोघांवर ज्या गोळ्या झाडल्या त्यात या दोघांचा जागीच मृत्यू झाला. अतीक अहमदच्या मुलाचं एन्काऊंटर कऱण्यात आलं. त्यापाठोपाठ आता अतीक आणि अशरफ या दोघांची हत्या करण्यात आली.**

# भ्रष्टाचाराबद्दल मोदी बेफिकीर!

## सत्यपाल मलिकांचा खळबळजनक आरोप

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदींना देशातील भ्रष्टाचाराची यतकिंचितही पर्वा नाही... अदानी भाजपलाच गिळंकृत करेल... केंद्रीय गृहमंत्रालयाच्या चुकीमुळे पुलवामामध्ये जवानांवर विनाशकारी हल्ला झाला... काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेण्याचा निर्णय चुकीचा असूनही मोदी बेफिकीर होते... ते स्वतःच्या दुनियेत मस्त आहेत..., असे अनेक खळबळजनक आरोप अविभाजित जम्मू-काश्मीरचे अखेरचे राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी 'द वीक' या डिजिटल नियतकालिकेला दिलेल्या मुलाखतीमध्ये केले आहेत.**

जम्मू-काश्मीरमध्ये प्रकल्पांना मंजुरी देण्यासाठी ३०० कोटींच्या 'कमिशन'ची ऑफर मलिकांना देण्यात आली होती. त्याबाबत मलिक म्हणाले की, भाजप-संघाचे नेते राम माधव यांनी जलविद्युत योजना आणि रिलायन्स विमा योजना मंजूर करण्यासाठी माझ्याशी संपर्क साधला होता, पण, मी ऑफर स्वीकारण्यास मी नकार दिला. मी गैर काम करणार नाही, असे मी सांगितले. राम माधव सकाळी सात वाजता मला भेटायला आले, त्यांनी माझे मत बदलण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी लोक मला सांगत होते की, दोन्ही योजना मंजूर करण्यासाठी मला ३०० कोटी रुपये मिळतील! मी ही बाब मोदींना सांगितली होती. भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे पंतप्रधानांच्या लक्षात आणून दिली होती. पंतप्रधानांच्या आजूबाजूचे लोक भ्रष्टाचारात गुंतले आहेत आणि अनेकदा ते पंतप्रधान





कार्यालयाचा गैरवापर करतात असे सांगूनही त्यांनी दुर्लक्ष केले. पंतप्रधाना भ्रष्टाचाराबद्दल बेफिकीर आहे, असे मलिक म्हणाले.

**गप्प राहण्याचे फर्मान**

विशेष म्हणजे, पुलवामा हल्ल्यानंतर लगेच मोदींनी मला फोन केला, तेव्हा गृहमंत्रालयाचा गलथानपणासह सर्व त्रुटींची माहिती त्यांनी दिली. हे ऐकल्यानंतर मोदींनी मला या विषयावर गप्प राहण्याची सूचना केली. याबद्दल कोणाकडेही चकार शब्द काढू नका, असे फर्मान काढले गेले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी देखील स्वतंत्रपणे फोन करून 'शांत' राहण्यास सांगितले होते. पाकिस्तानवर दोषारोप टाकून मोदी सरकार आणि भाजपला २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत फायदा मिळवण्याचा हेतू असल्याचे माझ्या लगेच लक्षात आला, असे दावा मलिक यांनी केला.

### पुलवामाची चूक गृहमंत्रालयामुळे!

**» फेब्रुवारी २०१९ मध्ये झालेला पुलवामामध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ताफ्यावर झालेला दहशतवादी हल्ला हा संपूर्ण भारतीय यंत्रणेचे अपयश होते. 'सीआरपीएफ' आणि केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अकार्यक्षमता व बेफिकिरीचा परिणाम होता, असा आरोप मलिक यांनी केला. 'सीआरपीएफ'च्या ताफ्याच्या स्थलांतरणासाठी फक्त ५ विमानांची गरज होती. पण, राजनाथ सिंह यांच्या अखत्यारितील गृहमंत्रालयाने ती पूर्ण केली नाही. त्यामुळे नाइलाजाने हा ताफा भूमार्गी नेला गेला. खरेतर जवानांचा ताफा जाण्यापूर्वी संपूर्ण मार्ग निर्धोक असल्याची खात्री करून घ्यायला हवी पण, त्यातही कुचराई केली गेली, असा दावा मलिक यांनी केला.**

**काश्मीरबद्दल अज्ञान...**

पुलवामा हल्ल्यात वापरले गेलेले ३०० किलो आरडीएक्स पाकिस्तानातून आले होते हे खरे पण, ही स्फोटके घेऊन जाणारी कार १०-१५ दिवस जम्मू-काश्मीरच्या रस्त्यांवर आणि गावांमध्ये फिरत होती. त्याचा सुगावाही गुप्तहेर यंत्रणांना लागला नाही, हे मोठे अपयश म्हणावे लागेल, असे मलिक म्हणाले. ऑगस्ट २०१९मध्ये केंद्र सरकारने अनुच्छेद ३७० रद्द करून जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतला. हा निर्णय पूर्णतः चुकीचा होता. विशेषाधिकार पुन्हा बहाल करण्यास मी मोदींना सांगितले होते. मोदींना काश्मीरबद्दल काहीही माहिती नाही, ते अज्ञानी आहेत, असे मत मलिक यांनी मांडले.

**अदानी प्रकरणाचा फटका बसणार!**

अदानी घोटाळ्यामुळे पंतप्रधानांचे नुकसान झाले असून हे प्रकरण आता गावागावांत लोकांना माहिती झाले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला त्याचा मोठा फटका बसेल. राहुल गांधींना संसदेत बोलण्याची परवानगी नाकारणे ही अभूतपूर्व चूक होती. राहुल गांधींनी अदानी घोटाळ्यावर योग्य प्रश्न विचारले होते, त्यावर पंतप्रधानांना स्पष्ट उत्तरे देता आली नाहीत, असेही मलिक यांनी मुलाखतीत म्हटले आहे.

# पूजा सावंतबरोबरच्या अफेअरच्या चर्चांवर वैभव तत्ववादीचे भाष्य

'कॉफी आणि बरंच काही', 'व्हॉट्सअप लग्न', 'भेटली तू पुन्हा', 'मिस्टर अँड मिसेस सदाचारी' यांसारख्या चित्रपटातून वैभव तत्ववादीने अभिनयाचा ठसा उमटवला. वैभवने मराठीबरोबर हिंदी चित्रपटसृष्टीतही स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. बाजीराव मस्तानी, मणिकर्णिका या बॉलिवूड चित्रपटांमधील वैभवने साकारलेल्या भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. आता वैभव सर्किट या नव्या कोऱ्या मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

मनोरंजन विश्वात काम करताना वैभवचं नाव अनेक मराठी अभिनेत्रींबरोबर जोडलं गेलं होतं. अभिनेत्री पूजा सावंत व वैभव तत्ववादीची ऑन स्क्रीन जोडी प्रेक्षकांना आवडली होती. तसंच प्रार्थना बेहेरेबरोबरच्या त्याच्या जोडीलाही प्रेक्षकांनी पसंती दर्शविली होती. प्रार्थना बेहेरबरोबर वैभव रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. तर पूजा सावंतबरोबरही त्याचं नाव जोडलं गेलं होतं. 'लोकमत फिल्मी'ला दिलेल्या मुलाखतीत वैभवने या अफेअरच्या चर्चांवर भाष्य केलं."अनेक अभिनेत्रींबरोबर तुझं नाव जोडलं गेलं होतं. पूजा व प्रार्थनाबरोबर अफेअर असल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. त्या खऱ्या होत्या की खोट्या?" असा प्रश्न वैभवला विचारण्यात आलं. यावर उत्तर देत वैभव म्हणाला, "आम्ही चांगले मित्र होतो आणि आहोत."



# एकेकाळी मंदिरा राहायची भाड्याच्या घरात, आज आहे करोडोंची मालकीण!

टीव्हीच्या दुनियेपासून ते चित्रपटांपर्यंत आणि मग क्रिकेटच्या मैदानापर्यंत मंदिरा बेदी खूपच प्रसिद्ध आहे. तिचे कौतुक करावे तितके कमी आहे. ती प्रत्येक अर्थाने परिपूर्ण कलाकार आहे. वयाच्या 51 व्या वर्षी आजकालच्या तरुण अभिनेत्रीही तिची अप्रतिम फिगर पाहून लाजतात.

मंदिरा जर सर्व क्षेत्रात परिपूर्ण असेल तर कल्पना करा की ती एका दिवसात किती कमावत असेल? तिची लाइफस्टाइल कशी असेल? आज आम्ही तुम्हाला मंदिराच्या वाढदिवसानिमित्त तिच्या संपत्तीबद्दल सांगत आहोत...

सिनेमाच्या दुनियेत छोट्या पडद्यावर पदार्पण करणाऱ्या मंदिरा बेदीने आपल्या करिअरमध्ये सर्वप्रथम टीव्हीच्या दुनियेत पाऊल ठेवले. मंदिराला ऑडिशन दिल्यानंतर पहिला ब्रेक 1994 मध्ये डीडी नॅशनलच्या 'शांती' या मालिकेमधून मिळाला. मंदिरानं 'शांती' मालिकेनंतर अनेक मालिकांमध्ये काम केलं . 'औरत', 'क्यूंकी सास भी कभी बहू थी', 'इंडियन आयडॉल', 'फेम गुरुकुल', 'डील या नो डील' या मालिकांमध्ये तिनं काम केलं आहे.

'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' या चित्रपटात देखील तिनं काम केलं. तसेच मंदिरा ही आयपीएल आणि वर्ल्ड कप यांसारख्या मॅचचे अँकरींग देखील करते. 2003मध्ये आयसीसी वर्ल्ड कपमध्ये मंदिरानं पहिल्यांदा अँकरींग केलं. मंदिरा आज करोडोंची मालकिन आहे, पण तुम्हाला माहित आहे का की एकेकाळी ही अभिनेत्री मुंबईत भाड्याच्या घरात राहायची? अभिनेत्रीची एकूण संपत्ती 2.3 दशलक्ष डॉलर्स म्हणजे सुमारे 18 कोटी रुपये आहे. मंदिराच्या कमाईचा सर्वात मोठा हिस्सा चित्रपट आणि टीव्ही मालिकांमधून येतो. एका चित्रपटासाठी ती 50 लाख ते 1 कोटी रुपये मानधन घेते.

मंदिरा ही प्रसिद्ध फॅशन डिझायनर देखील आहे. ती स्वतः साडी डिझाइन करते, जी Amazon, Flipkart आणि Myntra सारख्या ई-कॉमर्स वेबसाइटवर उपलब्ध आहे. याशिवाय गार्मिन इंडियाने मंदिरा बेदी यांना फिटनेस कोच आणि ब्रँड ॲम्बेसेडर देखील बनवले आहे, ज्यासाठी अभिनेत्री सुमारे 2 ते 4 कोटी रुपये घेते.आजकाल स्टार्स त्यांच्या एका पोस्टवरून सोशल मीडियाच्या जगातून लाखो आणि करोडो रुपये कमावतात. अशा परिस्थितीत फिटनेस फ्रीक आणि स्टाईल आयकॉन असलेली मंदिरा कशी मागे राहील? इन्स्टाग्रामवर अभिनेत्रीला सुमारे 1.5 मिलियन लोक फॉलो करतात. जाहिरातीसाठी ती ब्रँड्सकडून लाखो डॉलर्स घेते.मंदिराने तिचे फिटनेस फोटो, व्हिडिओ आणि स्टायलिश फॅशन लुक पोस्ट करून लाखो फॉलोअर्स मिळवले आहेत.



# समांथाची बॉक्स ऑफिसवर हवा!

टॉलिवूडची सुपरस्टार लेडी म्हणजे सामंथा ही तिच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच मनोरंजन करत आहे. साउथमध्ये सध्या अनेक चित्रपट आहेत ज्याची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. ते या चित्रपटांची प्रतिक्षा करत आहेत. त्याचपैकी एक चित्रपट होता तो म्हणजे सामंथा रुथ प्रभूचा 'शाकुंतलम' हा चित्रपट काल चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. पौराणिक ड्रामा असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन गुणशेखर यांनी केले असून नीलिमा गुणा आणि दिल राजू यांनी निर्मिती केली आहे.

'शाकुंतलम'ला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. तामिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळममध्ये धमाल करताना दिसत आहे. या चित्रपटाला सेलेब्सकडून जबरदस्त रिव्ह्यू मिळत असतानाच प्रेक्षकांनाही हा चित्रपट खूप आवडला आहे


दरम्यान, शकुंतलमच्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहे. शकुंतलम या चित्रपटाने पहिल्या दिवशी किती कोटींची कमाई केली ते जाणुन घेवुया.

समोर आलेल्या आकडेवारी नुसार, समंथा रुथ प्रभू स्टारर शकुंतलम या चित्रपटाने पहिल्या दिवशी 5 कोटींची कमाई केली आहे. याशिवाय 'शकुंतलम'ने यूएस बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी 125 हजार डॉलर्सची कमाई केली आहे. शकुंतलम यांनी फारसे प्रमोशन पाहिले नसेल. पण हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. 80 करोडच्या बजेटमध्ये तयार करण्यात आलेल्या हा चित्रपट या वीकेंडला किती कोटींची कमाई करतो हे पाहावे उत्सुकतेचे आहे.



# पठाणनंतर किंग खानच्या 'डंकी'चा डंका!

बॉलीवूडचा किंग खानच्या पठाणनं बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केली. पठाणवरुन साऱ्या देशभरात वाद सुरु झाला असताना तो चित्रपट चालेल की नाही याविषयी शंका होती. पण दीपिका पदुकोण, जॉन अब्राहम यांच्या भूमिका असलेल्या पठाणनं प्रेक्षकांना वेड लावलं. यानंतर शाहरुखच्या नव्या चित्रपटाचा फर्स्ट लूक समोर आला आहे.




खरतरं शाहरुखनं गेल्याच वर्षी प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांच्या डंकीचं शुट पूर्ण केलं होतं. मात्र तो चित्रपट बऱ्याच अडचणींमध्ये फसला त्यामुळे त्याच्या रिलिज तारखांचा घोळ झाल्याची माहिती समोर आली. यातच शाहरुखचा पठाण बऱ्याच दिवसांपासून लांबणीवर पडला होता. त्यामुळे डंकीकडे फारसे लक्ष गेले नाही. आता डंकीचा फर्स्ट लूक समोर आला असून त्याला नेहमीप्रमाणे चाहत्यांचा जोरदार प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे.आखाती देशांमध्ये शाहरुखच्या डंकीचे चित्रिकरण झाले असून शाहरुखच्या या चित्रपटाविषयी चाहत्यांना मोठी उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. शाहरुखनं त्या व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये ग्रीन टी शर्ट, फंकी वॉच आणि खांद्यावर बॅग अशा वेशभूषेमध्ये फोटो शेयर केला आहे. त्यात तो दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांच्यासोबत बोलताना दिसतो आहे. जिओनं गेल्या वर्षी शंभर चित्रपटांची घोषणा केली असून त्यातील काही चित्रपट आता प्रदर्शनाच्या उंबरठ्यावर असल्याचे सांगण्यात आले आहे.

# यहा के हम सिकंदर!



## रोमांचक सामन्यात पंजाब किंग्सचा लखनऊवर दोन गडी राखून विजय

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ मधील २१वा सामना पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात होत आहे. या सामन्यात पंजाब किंग्जचा कर्णधार शिखर धवनच्या रूपाने मोठा धक्का बसला. शिखर धवन दुखापतीमुळे या सामन्यात संघाचा भाग होऊ शकला नाही. धवनच्या जागी अष्टपैलू सॅम करन पंजाब किंग्जची जबाबदारी सांभाळत होता. या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने पंजाब किंग्ससमोर १६० धावांचे माफक लक्ष्य ठेवले होते. शेवटच्या षटकापर्यंत झालेल्या रंजक सामन्यात पंजाबने दोन विकेट्सने अफलातून विजय संपादन केला.**

धावांचा पाठलाग करताना लखनऊ येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर दोघांमधील हा सामना खेळवला जात असल्याने येथील द्विधावस्थेत टाकणारी खेळपट्टी आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा पंजाब फलंदाजी करण्यासाठी आला. १६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्याच षटकात सलामीवीर अथर्व तायडे खाते न उघडता तंबूत परतला. तिसऱ्या षटकात ४ धावा काढून प्रभासिमरन बाद झाला. पॉवर-प्लेच्या शेवटच्या चेंडूवर मॅथ्यू शॉर्ट २२ चेंडूत ३४ धावा करून तंबूत परतला. त्याने आपल्या खेळीत ५ चौकार आणि एक षटकार लगावला. सिकंदर रझाने एका बाजू सांभाळून धरत झुंजार खेळी फलंदाजी केली, त्याने राहून ३४ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. कर्णधार सॅम करन ६ धावा करून बाद झाला. जितेश शर्मालाही केवळ दोन धावा करता आल्या. सिकंदर रझा १८व्या षटकात ४१ चेंडूत ५७ धावा करून बाद झाला. यानंतर शाहरुख खानने १० चेंडूत २३ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी, शिखर धवन दुखापतीमुळे आजच्या सामन्यात खेळू शकला नाही त्याच्याऐवजी सॅम करन पंजाब किंग्सचे नेतृत्व करण्यासाठी मैदानावर उतरला. त्याने नाणेफेक जिंकून लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. कर्णधार लोकेश राहुल व कायले मायर्स यांनी आक्रमक सुरूवात करताना ७.४ षटकांत ५३ धावा फलकावर चढवल्या. हरप्रीत ब्रारने पंजाब किंग्सला पहिले यश मिळवून देताना मायर्सची (२९) विकेट घेतली. दीपक हुडा (२) पुन्हा अपयशी ठरला, सिकंदर रझाने त्याला पायचीत केले. लोकेशने या सामन्यात आयपीएलमधील ४००० धावांचा टप्पा ओलांडला. त्याने सर्वात कमी १०५ डावांमध्ये या धावा करताना ख्रिस गेलचा ( ११२ डाव) विक्रम मोडला. डेव्हिड वॉर्नर (११४), विराट कोहली (१२८) आणि एबी डिव्हिलियर्स ( १३१) यांचा क्रमांक नंतर येतो. राहुलने ४० चेंडूंत यंदाच्या आयपीएलमधील पहिले अर्धशतक पूर्ण केले आणि आयपीएलमध्ये कर्णधार म्हणून २००० धावाही त्याने पूर्ण केल्या.

### दोलायमान होत असलेल्या सामन्यात सिकंदर ठरला

**आजच्या सामन्यात कधी लखनऊ तर पंजाब असा सामना झुकत होता. पहिल्या सहा षटकात ४३ नंतर ७ ते १५ मध्ये ७० आणि नंतर १६ ते २० मध्ये ५७ धावा करत पंजाबने सामना आपल्या नावावर केला. सिंग इज किंग म्हणत पंजाबच्या सिकंदर रझाने अप्रतिम शतक झळकावले. लखनऊकडून युधवीर सिंग, मार्क वूड आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. तर कृष्णाप्पा गौतम आणि कृणाल यांना प्रत्येकी एक गडी बाद करण्यात यश मिळाले. त्यामुळे आरसीबीसाठी हसरंगा गेम चेंजर ठरू शकतो.**

# विजयकुमारच्या गोलंदाजीची कमाल!

## बंगळुरुचा दिल्लीवर मोठा 'विजय'; DC चा सलग चौथा पराभव

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये रॉयल चॅलेंजर्स बँगलोर आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात रंगतदार सामना झाला. दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार डेव्हिड वॉर्नरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या आरसीबीच्या फलंदाजांनी २० षटकांत ६ विकेट्स गमावत १७४ धावांपर्यंत मजल मारली. परंतु, या धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सच्या फलंदाजांची मात्र पुरती दमछाक झाली.**

पॉवर प्ले मध्येच दिल्लीचा अर्धा संघ गारद झाला. पृथ्वी शॉ आणि मिचेल मार्शला भोपळाही फोडता आला नाही. दोन्ही फलंदाज शून्यावर बाद झाल्यानंतर कर्णधार डेव्हिड वॉर्नर १९ धावा करून तंबूत परतला. त्यामुळे दिल्ली कॅपिटल्सची दाणादाण उडाली अन् आयपीएल २०२३ मध्ये सलग चौथा पराभव झाला. दिल्लीने २० षटकात ९ विकेट्स गमावत १५१ धावा केल्या. त्यामुळे आरसीबीने या सामन्यात विजयाचा शिक्कामोर्तब केला.

दिल्ली कॅपिटल्सचा फलंदाज यश धुल आणि अभिषेक पोरेल स्वस्तात माघारी परतला. पण अनुभवी मनिष पांडेने आरसीबीच्या गोलंजदाजांचा समाचार घेत ३८ चेंडूत ५ चौकार आणि १ षटकार मारत ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. अक्षर पटेलने १४ चेंडूत २१ धावा केल्या.



विजयकुमारच्या गोलंदाजीवर अक्षर झेलबाद झाला. आरसीबीसाठी विजय कुमारने ३ विकेट्स घेत आरसीबीची विजयाच्या दिशेनं वाटचाल केली. तसंच मोहम्मद सिराजनेही २ विकेट्स घेत दिल्लीला मोठा धक्का दिला.विराट कोहलीने आजच्या सामन्यातही दमदार शतक ठोकलं. विराटने ३४ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ५० धावा कुटल्या. परंतु ललिल यादवच्या गोलंदाजीवर कोहली बाद झाला आणि आरसीबीला मोठा धक्का बसला. कर्णधार फाफ डु प्लेसिसने या सामन्यात २२ धावांची खेळी केली. त्यानंतर आरसीबीसाठी माहिपाल लोमरोरने १८ चेंडूत २६ धावा केल्या. दिल्लीचा वेगवाना गोलंदाज मिचेल मार्शने माहिपालला २६ धावांवर पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यानंतर कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर ग्लेन मॅक्सवेल २४ धावांवर झेलबाद झाला.

आरसीबीच्या धावसंख्येची गती मंदावली असतानाच कुलदीप यादवने भेदक मारा करून आरसीबीच्या समस्येत वाढ निर्माण केली. कुलदीपने एकाच षटकात दोन विकेट्स घेऊन आरसीबीच्या फलंदाजीचा गड ढासळला. कुलदीपने मॅक्सवेल आणि दिनेश कार्तिकला बाद केल्यानं दिल्ली कॅपिटल्सला आरसीबीची धावसंख्या रोखता आली.